माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १२३/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. गौतम चिरकुटराव कुडवे,**
रा. पो. बोरगाव (टुमणी), ता. आष्टी, जि. वर्धा.

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, बोरगांव (टु.), ता. आष्टी, जि. वर्धा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषि अधिकारी (ग्रा. पं.)**
पंचायत समिती, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १८.४.२०२२**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित (तर्फे) |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २१.०४.२०१८ | -- | १०.०१.२०२० |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार अपील क्र. १०५४/२०१८, दिनांक २१.०४.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आज दिनांक १८.०४.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. व्हि. जी. देशमुख उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. १०५४/२०१८ अन्वये आयोगाने दिनांक २१.०४.२०१८ रोजी सुनावणी घेवून " अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मोघम व व्यापक स्वरुपाची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रत्येक वर्षातील कामाची माहिती देणे अपेक्षीत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी एका वर्षातील एका कामाची पूर्ण माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व अन्य कामाच्या माहितीबाबत स्वतंत्र अर्ज सादर करावा " असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १०.०१.२०२० रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावरील आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, आयोगाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोग कार्यालयातून वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या आदेशाचे अनुपालन करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. मात्र, तक्रारकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तसेच त्यांनी शास्तीबाबतचा खुलासाही आयोगास सादर केल्याचे दिसून येत नाही. ही बाब गंभीर असून आयोगाचे आदेश सुस्पष्ट असूनही तक्रारकर्ता यांना कुठलीही माहिती प्रदान केल्याचे दिसून येत नाही.

सदर प्रकरणात तक्रारकर्ता, श्री. गौतम कुडवे यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाच्या आदेशाचे पालन न करणे, माहिती अधिकाराचा दुरुपयोग करणे तसेच अनेक प्रकरणात घोटाळा केल्याबाबतचा गंभीर आरोप केला आहे. आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न होणे, ही गंभीर बाब असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)(ग) व २०(१) अन्वये दोषी असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे **तक्रारकर्ता, श्री. गौतम कुडवे हे नुकसान भरपाईस पात्र ठरत आहे. तक्रारकर्ता यांना या प्रकरणी आयोगाचे आदेश असतांनाही कुठल्याही माहितीचे प्रदान न झाल्यामुळे त्यांना आर्थिक, शारिरीक व मानसिक त्रास झालेला आहे. त्यामुळे तक्रारकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोरगाव (टु) ता. आष्टी, जि. वर्धा यांचेकडून वसुल करुन तक्रारकर्त्यास प्रदान करावी. तसेच कृषि अधिकारी (ग्रा. पं.) पंचायत समिती, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा यांनी वरील आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे आदेशीत करण्यात येत आहे.**

आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच ७ दिवसात तक्रारकर्त्यास विनामुल्य माहितीचे प्रदान करावे, असे आदेशीत करुन प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**
**दिनांक ०६.०४.२०२२**

**जा.क्र.** 3424 **दि.**------------

7 JUN 2022

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर शाखा ★ नागपूर ★ सत्यमेव जयते